जा.क्र.प्राफसंके/उद्घाटन /२६७२/२०२२
ता. वेंगुर्ला, जि. सिंधुदुर्ग
दिनांक: ०२/११/२०२२

**प्रति,**

........................
........................
.........................

**विषय: प्रादेशिक फळ संशोधन केंद्र वेंगुर्ला येथे दि. १० ते १५ नोव्हेंबर, २०२२ या कालावधीत महनिय व्यक्तींकरीता अल्पोपहार/स्नॅक्स आणि भोजन पुरविण्याचे दरपत्रक मिळणेबाबत.....**

**महोदय,**

प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ला येथे दि. १० ते १५ नोव्हेंबर, २०२२ या कालावधीत ‘कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्र, या नूतन इमारतीचा उद्घाटन सोहळा आयोजित करण्यात येणार आहे. तरी या कार्यक्रमास उपस्थित महनिय व्यक्तींना तसेच शेतकऱ्यांना अल्पोपहार व भोजन पुरवावयाचे आहे. तरी त्याकरीता खालील तपशिलाप्रमाणे दरपत्रक मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | तपशिल | अंदाजित दर (प्रति ताट/नग) |
|---|---|---|
| १ | स्पे. शाकाहारी जेवण (चपाती, पालेभाजी, पनीर भाजी, उसळ, दालफ्राय, भात, पापड, लोणचे, सोलकडी, कोशिंबीर, दही, स्वीट डीश (श्रीखंड/गुलाबजाम) ) | |
| २ | स्पे. मच्छी जेवण (चपाती/भाकरी/वडे, १ भाजी, मच्छी फ्राय (सुरमई), मच्छीकडी, बांगडा तिखल, जवळा चटणी, भात, सोलकडी, सॅलड) | |
| ३ | स्पे. मटण जेवण (चपाती, १ भाजी, सुक्का मटण, मटण रस्सा, भात, सोलकडी, सॅलड) | |
| ४ | व्हेज पुलाव | |
| ५ | सुरमई फ्राय पीस | |
| ६ | कोळंबी फ्राय प्लेट | |
| ७ | कोळंबी मसाला प्लेट | |
| ८ | मटण सुक्का प्लेट | |
| ९ | बटर स्कॉच/व्हॅनिला आईस्क्रिम (फॅमिली पॅक) | |

याबाबत आपणांस विनंती करण्यात येते की, कृपया आपण वरील तपशिलाप्रमाणे दर नमुद करून दरपत्रक दि. ११/११/२०२२ पर्यंत या कार्यालयास प्राप्त होईल अशा त—हेने सादर करावे. उशिरा प्राप्त होणाऱ्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

**अटी व शर्ती खालीलप्रमाणे**

१. दरपत्रकाचा लखोटा मोहोरबंद करून त्यावर प्रादेशिक फळ सशोधन केंद्रासाठी अल्पोपहार/स्नॅक्स/भोजन पुरविणेबाबत दरपत्रक असे स्पष्ट नमूद करावे.
२. दरपत्रकातील दर हे सर्व करासहीत स्पष्टपणे नमूद असावेत.
३. दरपत्रक सहयोगी संशोधन संचालक, प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ला ता. वेंगुर्ला जि. सिंधुदुर्ग या पत्त्यावर पाठवावे.
४. भोजन वाटपाची जबाबदारी संबंधीत पुरवठादाराची राहील.
५. सर्व वेटर्सना गणवेश असावा.
६. एक किंवा सर्व दरपत्रके नाकारण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकारानी राखून ठेवला आहे.

**आपला विश्वासू,**

**सहयोगी संशोधन संचालक**